# <u>नियमीत दिवाणी दावा क्र. ०८/२०२० मधील</u>

## <u>नि.३८वरील आदेश</u>

## <u>सीएनआर–एमएचएसएन १२–००००४६–२०२०</u>

(दिपक पोटे मयत तर्फे वारस वि. लक्ष्मण पोटे वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.२ ने त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियतीचा हुकूम रद्द व्हावा यासाठी केलेला आहे.

२. प्रतिवादी नं.१ ने असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रतिवादी नं .२ हे व्यावसायिक असून, दरम्यानच्या काळात कोव्हीड–१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे देशभरात लॉकडाऊन परिस्थीती उद्भवली होती. प्रस्तुत दावेकामी आवश्यक कागदपत्रांची जमवाजमव करता आली नाही. त्यामुळे, वकीलांकडे वेळेत कागदपत्रे सुपूर्द करता आली नाहीत, त्यामुळे वेळेत कैफियत देता आली नाही. प्रतिवादी नं.२ ने जाणूनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादी नं.२ ची कैफियत दाखल न करुन घेतल्यास प्रतिवादी. नं २ चे अपरिमित व पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. या उलट कैफियत दाखल करुन घेतल्यास वादींचे काही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रतिवादी. नं २ विरुद्ध विना कैफियत आदेश झालेला आहे, तो रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

३. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज व अर्जातील मजकुर मान्य व कबूल नाहीत. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.२ यांनी विनाकारण दावा प्रलंबित ठेवण्यासाठीच सादर केला आहे. प्रतिवादी नं.२ यांना वेळोवेळी संधी देवूनही वादींना त्रास देण्यासाठी व वादींच्या आजारपणाचा फायदा घेण्यासाठी

विलंबाने अर्ज केला आहे. जर अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादी नं.२ यांना कॉस्ट करण्यात यावी. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादींतर्फे विद्वान विधींज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींच्या विद्वान विधीज्ञांनी अर्जातील व म्हणण्यातील कथनांच्या अनुषांगाने युक्तीवाद केला. प्रतिवादी नं.२ विरुद्ध विना युक्तीवाद अर्ज चालवण्यात आला.

५. कोरोनाच्या आजाराने उद्भवलेल्या परिस्थीतीचा विचार करता, तांत्रीक बाबींना जास्त महत्व न देता दावा गुणदोषावर चालणे जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून अर्ज मंजुर करणे योग्य राहील. सबब, मी खालील आदेश पारित करतो.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.२ यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश सेट असाईड करण्यात येतो.

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2022.02.04 17:34:26 +05'30'

**पलुस.** **(नि.दि. रुद्रभटे )**

**दिनांक– ०४/०२/२०२२** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pravin G. Sabale |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 04/02/2022 |
| Signed by the Presiding Officer on | : | 04/02/2022 |
| Uploaded on | : | 04/02/2022 |